।। ज्ञानस्य निर्मलं नेत्रं ज्योतिष्यकमनुत्तमम् ।।

# ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणे

## वार्षिक कार्यवृत्तांत - २००९-१० - वर्ष ६६ वे

स्थापना - श्री गणेशचतुर्थी शके १८६६, ता. २२ ऑगस्ट १९४४

टिळक स्मारक मंदिर, टिळक रस्ता, पुणे ४११०३०

भारतातील हौशी खगोलनिरीक्षकांची पहिली संस्था

# २००९-१० वर्षाचा कार्य आढावा

यंदाचे वर्ष हे International Astronomy Year होते. त्यामुळे संस्थेच्या २००९-१० या वर्षाचा कार्याचा वृत्तांत सादर करण्यास प्रशासक मंडळास आनंद होत आहे.

मावळत्या प्रशासक मंडळातील खालील सभासद व त्यांच्याकडे असलेले कामाचे स्वरूप खालील प्रमाणे होते.

अध्यक्ष- श्री. शेखर फाटक
उपाध्यक्ष- श्री. मुजतबा लोखंडवाला
कार्यवाह- श्री. दीपक जोशी
सदस्य-

१) श्री. अनिरुद्ध देशपांडे

२) श्री. शैलेश टिळक

३) श्री. अमोद रायरीकर

४) श्री. अमित कडलासकर

५) कु. रूचा कुलकर्णी

६) सौ. अपर्णा किंकर

७) श्री. प्रभाकर खोले

International Year of Astronomy मध्ये संस्थेतर्फे विविध कार्यक्रम करण्यात आले. त्यात सर्व सदस्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल धन्यवाद.

यंदाच्या वर्षात संस्थेतर्फ़े आकाश दर्शनाचे कार्यक्रम करण्य़ात आले ते खालील प्रमाणे-

| दिनांक | स्थळ | सहभागी व्यक्ती |
|---|---|---|
| २५.४.२००९ | निसर्गराजा | ४२ |
| २४.१०.२००९ | निसर्गराजा | १८ |
| १७.११.२००९ | निसर्गराजा | ८० |
| ०९.१.२०१० | निसर्गराजा | २८ |
| २०.२.२०१० | निसर्गराजा | २५ |

- २२ जुलै २००९ रोजी असलेले सूर्यग्रहण पहाण्यासाठी संस्थेचे सभासद वेगवगळ्या ठिकाणी गेले होते. काहींना डायमंड रिंग बघण्याचा अनुभव घेता आला. संस्थेतर्फे केसरीवाडा येथे ग्रहण बघण्याचा कार्यक्रम करण्यात आला परन्तु पावसामुळे तेथुन काहीच दाखविता आले नाही. संस्थेच्या रूचा कुलकर्णी यांनी live updates Radio Mirchi वर सांगितले.
- दि. २ ऑगस्ट ०९ रोजी नेहरु तारांगण मुंबई येथे अभ्यास सहल आयोजित केली होती. यास २९ सभासद आले होते. श्री. अमित कडलासकर व सौ. अपर्णा किंकर यांनी नियोजन उत्तम प्रकारे पार पाडले.
- दि.१७ नोव्हेंबर ०९ रोजी उल्कावर्षाव दाखवण्याचा कार्यक्रम संस्थेतर्फे ताम्हिणी येथे करण्यात आला. या कार्यक्रमास लोकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. उल्का बघण्यासाठी २ बस ची व्यवस्था केली. या कार्यक्रमाचे नियोजन श्री. दिपक जोशी व श्री. अनिरुध्द देशपांडे यांनी केले.
- दि. १५ जानेवारी २०१० रोजी सूर्यग्रहण असल्याने संस्थेने सर्वांसाठी खुला कार्यक्रम शनिवारवाडा येथून केला. या कार्यक्रमास २५०० ते ३००० लोक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नियोजन श्री. दिपक जोशी व श्री. अनिरुध्द देशपांडे यांनी उत्तम प्रकारे केले. त्याचे live updates आणि संस्थेच्या सभासदांची मुलाखत लोकांना IBN लोकमत वर दाखवण्यात येत होते. या कार्यक्रमास सौ. अपर्णा किंकर व श्री. प्रभाकर खोले यांनीही मदत केली. संस्थेतर्फे Solar goggles ठेवण्यात आले होते. तसेच कार्यक्रमाचे फोटो विविध वर्तमानपत्रातही छापून आले. आपल्या संस्थेचे काही सभासद वेगवेगळ्या ठिकाणी ग्रहण पहाण्यास गेले होते. त्यांनीही काढलेले फोटो संस्थेत पाहण्यास मिळाले.

- 10” Telescope च्या Declination Motor चा number शोधून काढून telescope working करण्यात आला. त्यातून पहिले observation घेण्यात आले ते “बुध” ग्रहाचे. Technology wise it works fine. संस्थेच्या सभासदांनी (श्री. अमोद रायरीकर, श्री. अनिरुद्ध देशपांडे, श्री. दीपक जोशी, श्री. समीर गोडबोले) अथक प्रयत्नांनी हा telescope व्यवस्थित कार्यरत केला. त्याद्वारे Photography करण्यात आली त्यात Orion, Vista movements यांचा समावेश होता. Antares चे occultation ही घेण्यात आले, त्याचे video recording करण्यात आले.या सर्वात अनिरुद्ध देशपांडे यांच्या प्रयत्नां बद्दल अभिनंदन!
- जानेवारी २०१० पासून Sakal Times मध्ये sky वर article येण्यास सुरुवात झाली. ते देण्यासाठी श्री. जोशी व श्रा. देशपांडे कार्यरत आहेत.